www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ


■ 'अभिजात भाषेला आधुनिक भाषा करण्याचे मोठे... पान ३ वर....


■ सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे... पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक २१९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, १५ जानेवारी २०२५ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### वाई, खंडाळा महाबळेश्वर मधील प्रलंबित कामे मार्गी लावा- मंत्री मकरंद जाधव-पाटील

**पुणे -** वाई, खंडाळा, महाबळेश्वर मधील जलसंपदा विभागाकडील प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना मदत व पूनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिल्या. पुणे येथे कृष्णा खोरे विकास महामंडळ, कार्यालयात झालेल्या बैठकीत मदत व पूनर्वसन मंत्री श्री. पाटील यांनी सूचना दिल्या.

या बैठकीस कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता ह. वि. गुणाले व ह. तु. धुमाळ, उपविभागीय अधिकारी श्री. कचरे यांच्यासह जलसंपदा विभागाचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कवठे-केंजळ उपसा सिंचन योजना, जांभळी बंधाऱ्याची उंची वाढविणे, जललक्ष्मी योजना-आकोशी पाणी पुरवठा योजना, देवघर उपसा सिंचन योजना, बळकवडी-देवघर योजनेतून खंडाळा तालुक्यातील वंचित १४ गावांना पाणी उपलब्ध करुन देणे आणि नागेवाडी धरणामध्ये भूसंपादन झालेल्या जमिनीचा मोबदला याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

### कोकण विभागीय लोकशाही दिनी ५ अर्ज प्राप्त

**नवी मुंबई :-** कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ११ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ०५आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १६ होते त्यापैकी ०१ अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यापैक १५ अर्ज प्रलंबित आहेत.

# पंतप्रधान आज मुंबई दौऱ्यावर

● मुंबई, विशाल कारंडे :

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (बुधवारी १५ जानेवारी) मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. मुंबई दौऱ्यादरम्यान भारतीय नौसेनेच्या तीन अत्याधुनिक युद्ध नौकांचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण केले जाणार आहे. मुंबई दौऱ्यात पंतप्रधान हे महायुतीच्या आमदारांशी संवाद साधणार आहेत. तसेच नवी मुंबईतील इस्कॉन मंदिराचे उद्घाटनदेखील करणार आहेत.**



## ■ तीन युद्धनौकांचे करणार लोकार्पण

भारतीय नौसेनेच्या माहितीनुसार लोकार्पण करण्यात येणाऱ्या तीन युद्धनौकांमध्ये, आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी आणि आयएनएस वाघशीर युद्धनौकेचा समावेश आहे. या तीन युद्धनौका म्हणजे देशाच्या सागरी सुरक्षेतील एक महत्त्वाची झेप असल्याचं भारतीय नौदलानं म्हटलं आहे. भारतीय नौदलाच्या माहितीनुसार आयएनएस निलगिरी हे १७ए स्टेल्थ फ्रिगेट प्रकल्पातील पहिलं जहाज आहे. भारतीय नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्युरोने त्याची रचना केली आहे. वाढीव क्षमता, समुद्रात जास्त काळ राहणे आणि स्टेल्थ यासारख्या प्रगत वैशिष्ट्यांसह ते नौदलात सामील करण्यात आलं आहे. ही युद्धनौका देशी फ्रिगेट्सच्या पुढील पिढीचं प्रतिनिधित्व करते. आयएनएस सुरत हे १५बी वर्गाच्या गाईडेड मिसाईल डिस्ट्रॉयर प्रकल्पाचं चौथे आणि अंतिम जहाज आहे. हे जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अत्याधुनिक विनाशकांपैकी एक आहे. यात ७५ टक्के स्वदेशी सामग्री आहे. ही युद्धनौका अत्याधुनिक शस्त्रे, सेन्सर पॅकेजेस आणि प्रगत नेटवर्क-केंद्रित क्षमतांनी सुसज्ज आहे. आयएनएस वाघशिर ही पी७५ स्कॉर्पीन प्रकल्पातील सहावी आणि अंतिम पाणबुडी आहे. ही पाणबुडी बांधणीत भारताच्या वाढत्या कौशल्याचं प्रतिनिधित्व करते. हे फ्रेंच नेव्हल ग्रुपच्या सहकार्याने बांधण्यात आल्याची माहिती भारतीय नौदलानं दिली आहे. देशाला देणार भक्कम सुरक्षा कवच- आयएनएस सूरत आणि आयएनएस निलगिरी या भारतीय नौदलाच्या अतिशय अद्ययावत युद्धनौका आहेत. देशाला हवाई सुरक्षा देण्यास त्या सक्षम आहेत. युद्धनौकांमुळे शत्रूनं डागलेले क्षेपणास्त्र सीमेपासून काही किलोमीटर अंतरावर हवेतच नष्ट करता येणार आहे. आयएनएस वाघशीर ही अद्ययावत पाणबुडी देशाच्या मारक क्षमतेत भर टाकणार आहे.

पान २ वर



# राज्यातील शाळांसाठी सीबीएसई पॅटर्न

● मुंबई, विशाल पाटील

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आलं. दरम्यान, या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही याबाबत माहिती दिली. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी, सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. त्यामुळे, राज्यातील सरकारी व अनुदानित शाळांमध्ये सुधारणा करण्यावर पुढील १०० दिवसांत शासनाकडून जोर देण्यात येत असल्याचे दिसून येते. तसेच, केंद्रीय शिक्षण पद्धतीचा गरजेनुसार अवलंबही केला जाईल. चालू वर्षात पहिलीच्या वर्गात सीबीएसई पॅटर्नचा विचार आपण करत आहोत, पुढच्या टप्प्यात सीबीएससी पॅटर्नच्या ज्या चांगल्या बाबी आहेत, त्या आपण शाळांमध्ये घेऊ, असे दादा भुसे यांनी म्हटलं. सन २०२६-२७ मध्ये सीबीएसई पॅटर्नचा वापर होईल, असेही शिक्षणमंत्र्यांनी म्हटलं. राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे राष्ट्रगीतापाठोपाठ राज्यगीत होणं अनिवार्य असल्याचे मतही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केलं.

पान २ वर

# आनंदवन येथील संस्थेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून ३ कोटी ८ लाखांचा निधी

● मुंबई, सचिन कदम :

चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा येथील आनंदवन महारोगी सेवा समिती संस्थेला कुष्ठरुग्णांचे उपचार आणि पुनर्वसनासाठी १ कोटी ८६ लाख रुपये तर, आनंद अंध, मुकबधीर आणि संधीनिकेतन दिव्यांग कार्यशाळेसाठी १ कोटी २ लाख रुपये असे एकूण 3 कोटी 8 लाख रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी



दिले असून उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर निधी वितरीत करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात आली आहे.

पान २ वर

# खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

● मुंबई, राकेश गायकवाड :

ओला, उबेर व रॅपिडो सारख्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व कंपन्यांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. प्रवासी सुरक्षा, कार पुलींग, लायसन्स, ट्रॅफिक समस्या यासंदर्भातील



पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देश परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी दिले. राज्यातील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच शासकीय नियमावलीअंतर्गत आणण्यासंदर्भात आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिवहनचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपनीचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

पान २ वर

# वाल्मिक कराडला मकोका, १४ दिवसांची ठोठावली न्यायालयीन कोठडी

● बीड, दिगंबर जाधव :

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाकडं राज्याचं लक्ष लागलं असून, याप्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी सर्वच आरोपींना अटक केली. त्यांच्यावर मोकोकांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात जाहीर केल्यानुसार आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, याप्रकरणात मास्टरमाईंड असल्याचा आरोप झालेल्या वाल्मिक कराडवर अद्यापही खुनाचा गुन्हा दाखल झाला नाही. पण, सीआयडीकडून आज वाल्मिक



कराडवर देखील मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आलीय. दरम्यान, खंडणी प्रकरणात पोलीस कोठडी संपल्यानंतर वाल्मिक कराडला आज केज न्यायालयात हजर केलं असता, न्यायालयानं त्यास १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळं, खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडच्या जामिनाचा मार्ग मोकळा झाला आहे. आज कोर्टापुढं युक्तीवाद झाला. त्यांनी १० दिवसांची पोलीस कोठडी मागितली. त्यामध्ये त्यांनी १० मुद्दे घेत त्याच १० मुद्द्यांवर पोलीस कोठडी मागितली. त्यावर ३१ डिसेंबरला १५ दिवसांची पोलीस कोठडी दिली. त्यापैकी पुन्हा तेच १० मुद्दे सांगत त्यांनी इतर गुन्ह्यात तपास करायचा आहे, प्रॉपर्टी चेक करायची असं सांगितलं. त्यामुळं कोर्टानं आज दोन्ही सरकारी वकील आणि आमचा युक्तीवाद ऐकला आणि कोर्टानं त्यांचा पोलीस कोठडी मागण्याचा अर्ज फेटाळला आहे.

पान २ वर

# राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १६ जानेवारीला उद्घाटन

## देशभरातून एक हजार स्टार्टअप्सचा सहभाग - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

● मुंबई, विशाल कारंडे :

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता सुरू होणाऱ्या



या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली आहे. महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील १००० स्टार्टअप या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

पान २ वर

# मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा - आयुक्त डॉ. राजेश देशमुख

● नवी मुंबई, भावना जैन :

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित करुन दिलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमाची कोकण भवनामध्ये प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी दिले. सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (ईज ऑफ लिव्हिंग) यासाठी मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व नियोजनाच्या संदर्भात कोकण महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी आज कोंकण भवनातील पहिल्या मजल्यावरील समिती सभागृहात कोकण भवनातील सर्व अधिकाऱ्यांची



आढावा बैठक घेतली. या बैठकीस अप्पर आयुक्त (सामान्य शाखा) संजीव पलांडे, अप्पर आयुक्त (महसूल) नितिन महाजन, सह आयुक्त (पुनर्वसन) अमोल यादव तसेच कोकण भवनातील सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनूसार कार्यालयाचे वेबसाईट अद्ययावत करणे, 'ईज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेवर काम करणे, शासकीय कार्यालयात स्वच्छता मोहिम राबविणे, नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, शासकीय अधिकाऱ्यांनी शासकीय दौरे करतांना त्याठिकाणच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अंगणवाडयांना भेट देणे, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने कोकण भवनातील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

पान २ वर

### अभिनव पहल योजना

■ आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी यावेळी 'अभिनव पहल' या योजनेची माहिती दिली. 'अभिनव पहल' ही भारत सरकारची एक योजना आहे. या योजनेचा मख्य उद्देश प्रशासकीय सुधारणा करणे आणि सार्वजनिक तक्रारींचे निवारण करणे हा आहे. या योजनेच्या माध्यमातून नवनवीन संपकल्पना, नावीन्यपूर्ण उपक्रमांना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या हितासाठी शासकीय काम सुलभ व सोपे होण्याच्या दृष्टीने नवनवीन उपक्रम, संकल्पना तयार करुन त्या 'अभिनव पहल' योजनेच्या संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. जास्तीत जास्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या योजनेत भाग घ्यावा, असे आवाहन ही आयुक्त डॉ. राजेश देशमुख यावेळी यांनी केले.

# वाहतूककोंडीत पुणे जगात चौथ्या तर देशात तिसऱ्या क्रमांकावर

● पुणे, सुचिता सोनवणे :



देशातील वाढती लोकसंख्या आणि बेरोजगारीमुळे शहराकडे येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे शहरावरील ताण वाढत असून, त्याचा परिणाम वाहतुकीवर होत आहे. त्यामुळे शहरातील वाहतुकीचा वेग मंदावला असून, पुण्यात १० किलोमीटर प्रवासासाठी ३३ मिनिटे वेळ लागत आहे. तर पुण्यापेक्षा मुंबईतील वाहतुकीचा वेग जास्त आहे, अशी माहिती डच लोकेशन टेक्नॉलॉजीने तज्ज्ञ टॉमटॉमने केलेल्या सर्वेक्षणातून भारतात २०२४ मध्ये सर्वात गर्दीचं शहर कोलकाता पहिले ठरले आहे. त्यानंतर बंगळुरू आणि पुण्याचा क्रमांक लागतो.पुण्याचा विकास झपाट्याने होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून पुण्यात येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाहतुकीचा वेग कमी झाला आहे. वर्ष २०२३ मध्ये बंगळुरू हे भारतातील सर्वाधिक गर्दीचे शहर होते; परंतु २०२४ मध्ये कोलकाताने बंगळुरूला मागे टाकले असून, देशातील सर्वांत गर्दीचे शहर म्हणून पुढे आले आहे.

पान २ वर

## संपादकीय

# बदलती कौटुंबिक मानसिकता !

विभक्त कुटुंब पद्धतीनंतर आता एकांगी कुटुंब पद्धतीचा उगम होत आहे. या कुटुंब पद्धतीत फक्त पती-पत्नी आणि त्यांची अपत्य ती पण एक किंवा दोन याला कुटुंब म्हणून संबोधलं जाऊ लागलं आहे. दैनंदिन जीवन जगण्यासाठी पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीचा विचार अमलात येत होता; परंतु कालांतराने बदल होत गेले. लोकसंख्या वाढत गेली आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये संपत्तीची विभागणी होऊन या कुटुंब पद्धतीचा रूपांतर विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये कधी होऊन गेलं हे काळाच्या ओघात कळलंच नाही. आज कुटुंबामध्ये आपणाला आजी-आजोबा फार कमी प्रमाणामध्ये दिसत आहेत. त्याचा परिणाम स्वार्थी कुटुंबातील सदस्य बनण्यासाठी झालेला दिसून येत आहे. आज प्रत्येक कुटुंबामध्ये प्रत्येक सदस्यांच्या गरजा ह्या फार मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेल्या आहेत. माणूस पैसे कमावण्याच्या संपत्ती जमवण्याच्या आणि त्यातून समाजामध्ये प्रतिष्ठा मिळविण्यासाठी केविलवाणा प्रयत्न करताना दिसू लागला आहे. परंतु हे करत असताना कुटुंबातल्या प्रत्येक सदस्याची स्वार्थी भावना त्या ठिकाणी वाढताना दिसत आहे.पूर्वी कुटुंबाकर्ता हा योग्य दिशा देणारा, योग्य निर्णय घेणारा आणि सर्वांसाठी आदरणीय व्यक्ती म्हणून प्रत्येकाच्या मनामध्ये आदरणीय असायचा. अलीकडे कुटुंबाकरता ही बाब कुठेतरी फार कमी प्रमाणामध्ये दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे विभक्त कुटुंब पद्धती असलेले तीन किंवा चार सदस्य यापैकी आई-वडील आणि एक किंवा दोन मुले. या सदस्यांमधून कोणाचे वडील कमावते असतील, कोणाचे आई आणि वडील कमावते असतील. अशा कुटुंबामध्ये आपणाला असंच चित्र दिसून येतं की ज्याच्या घरामध्ये फक्त वडील कमावते आहेत त्या वडिलांची किंमत ठराविक वयापर्यंत बऱ्या प्रमाणात चांगली असते. परंतु विशिष्ट वयानंतर त्या कमवत्या पुरुषाची अवस्था त्या कुटुंबामध्ये अत्यंत दयनीय दृष्टिकोनातून आज होत आहे. ते कशामुळे तर कमावत्या पुरुषाबाबत महिन्याचा पगार झाल्यानंतर प्रत्येक सदस्याच्या गरजा पूर्ण केल्यानंतर त्या घरातील सदस्याकडून अर्थात त्या पुरुषाची पत्नी आणि मुले मुली यांच्याकडून त्यांना म्हणावे तेवढे स्थान मनामध्ये दिले जात नाही. प्रत्यक्ष घरामध्ये वागतानासुद्धा ते आपणाला दिसून येते. हे बहुतांशी घरांमधील वास्तव चित्र आहे...अशा परिस्थितीमुळे घरामधील सदस्यांचा सुसंवाद राहिलेला नाही. घरामधील सदस्य फक्त प्रत्येकाकडे स्वार्थी भावनेच्या दृष्टिकोनातून आपलं नातं टिकवण्याचा प्रयत्न करतायेत. त्यामुळे पूर्वी आजी-आजोबांच्या माध्यमातून मिळणारी संस्काराची शिदोरी आज मुला-मुलींना, सुना-बाळांना मिळतच नाही आणि भविष् मार्गक्रमण करत असताना भूतकाळात काय झालं वर्तमानात काय होतंय आणि भविष्यात काय करायचे याची सांगड त्या कुटुंबामध्ये कोणीही घालायला तयार नाही. त्यासाठी कोणालाही वेळ नाही. ही बाब तर प्रकर्षाने आपणाला ज्या कुटुंबामध्ये आई आणि वडील अर्थात पुरुष आणि महिला दोघेही कमावते असतील, तर त्या ठिकाणी मुले-मुली आणि आई-वडिलांचा संबंध हा फक्त सुट्टीच्या दिवशीच येतो. त्या सुट्टी दिवशी त्या सर्वांमध्ये किती वेळ सुसंवाद होत असेल, विचारांची देवाणघेवाण होत असेल, संस्काराचे बाळकडू दिले जात असतील त्यावर मात्र सध्या प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या परिस्थितीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका आईने निभावली पाहिजे. कारण आई हाच कुटुंबाचा अत्यंत महत्त्वाचा खांब असतो. त्या खांबामध्येच जर कुठेतरी बाधा असेल तर हे संस्काररूपी उभे राहणारं घराचं छत टिकेल का, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. जर स्वतःच्या कमावत्या पतीबरोबर पत्नीकडून सन्मानजनक वागणूक मुलामुलींसमोर मिळत नसेल किंवा कमावते पती-पत्नी यांच्यामध्येसुद्धा एकमेकांविषयीचा सन्मान आणि सुसंवाद नसेल, तर अशा परिस्थितीमध्ये त्या घरातील मुलांसमोर काय चित्र दिसतंय याच्यावर विचार करण्याची वेळ आली. आई-वडील दोघेही कमावते असतील तर त्या दोघांमध्ये कुठेतरी अहंपणा भरलेला असल्यास त्या दोघांमध्ये सन्मान आणि सुसंवाद राहू शकत नाही. त्यामुळे घरातील प्रत्येक सदस्य एकमेकांशी फक्त त्यांच्या गरजेपुरत्या स्वार्थी भावनेतून नातं जोडताना प्राधान्य देतात. त्यामुळे आत्ताच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या जागी भविष्यात एकांगी कुटुंब पद्धती यायला वेळ लागणार नाही. म्हणून सध्याच्या आई- वडिलांनी लक्षात घेतलं पाहिजे की, आपल्या स्वतःच्या आई- वडिलांची अर्थात आजी-आजोबांची कुटुंबाबद्दलची आणि कुटुंबातल्या सदस्यांबद्दलची जी काही मानसिकता होती, जे काही आपणाला संस्कार आपल्याला त्यांनी दिले, जे काही बाळकडू दिले ते आठवा आणि आज ते आपल्या मुलांना देत आहोत का हा विचार करा.

## आजची चित्रोळी



सहवास तुझा
जन्माचे सार्थक देतो !
तुझे करतांना माझा
जीव हरखून जातो !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# टाटा मुंबई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन म्हणजे सलोखा, एकता, संस्कृती आणि विविधतेचा उत्सव - क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई (विशाल पाटील) :** टाटा मुंबई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा म्हणजे सलोखा, एकता, संस्कृती आणि विविधतेचा उत्सव आहे. आपण सर्वजण मिळून १९ जानेवारी रोजी ही मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी करुया असे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथील व्हिविंग गॅलरी येथे टाटा मुंबई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या रिंगिंग बेल कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आणि आमदार छगन भुजबळ, क्रीडा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांच्यासह या स्पर्धेचे आयोजक विवेक सिंग, उज्ज्वल माथूर, टी नारायण, प्रायोजकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री श्री. भरणे म्हणाले, ही स्पर्धा होण्यासाठी रिंगिंग बेल वाजल्यापासून ४ दिवस १० तास ५० मिनिटे राहीले आहे. म्हणजे




काऊंट डाऊन सुरू झाले आहे. जगातील प्रमुख दहा आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धापैकी टाटा मुंबई मॅरेथॉन ही एक प्रमुख स्पर्धा आहे. देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील सर्वाधिक बक्षीस रक्कम असणारी आणि सर्वाधिक स्पर्धक असणारी ही मॅरेथॉन स्पर्धा असून या स्पर्धेचा नावलौकीक आहे.

टाटा मुंबई मॅरेथॉन ही मुंबई आणि महाराष्ट्राचा अभिमान आहे आणि देश विदेशातून ६०,००० हून अधिक धावपटूंचा सहभाग हे प्रेरणादायी आहे. टाटा, आयडीएफसी फर्स्ट बँक, आणि टीसीएस यांसारख्या प्रायोजकांच्या समर्पण, दृढनिश्चय, आणि उत्साहाने भारताला धावण्याच्या जागतिक नकाशावर स्थान दिले आहे. ब्रिटनचे मो फराह, सर्वात यशस्वी ट्रॅक ॲथलीट्सपैकी एक, यंदा आंतरराष्ट्रीय इव्हेंट ॲम्बेसेडर आहेत, त्यांची उपस्थिती हा नामवंत धावपटू आणि हौशी धावपटूंना प्रेरणा देणारा ठरेल असे मंत्री श्री भरणे सांगितले.यावेळी माजी मंत्री आणि आमदार श्री. भुजबळ यांनी मनोगत व्यक्त केले.

# महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्राला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल दोन राष्ट्रीय पुरस्कार

**मुंबई (विशाल कारंडे) :** विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा व त्याचे नियंत्रण करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीला देशातील सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र व ओपन ॲक्सेस (एसएलडीसी) या दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी अभिनंदन केले आहे. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने बेळगावमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले. याप्रसंगी केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे अध्यक्ष घनश्याम प्रसाद, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष व्ही. राजा, केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे माजी अध्यक्ष राकेशनाथ, ग्रीड इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक एस के. सोनी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले. या वेळी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे अधीक्षक अभियंता मिलिंद देवळे, उमेश भगत, उपमहाव्यवस्थापक नितीन पौनीकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) आनंद दळवी, कार्यकारी अभियंता दिनेश पाटील, व्यवस्थापक (मानव संसाधन) योगेश अघोर, सहाय्यक अभियंता विजय कांबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## पान १ वरून...

### पंतप्रधान आज मुंबई दौऱ्यावर

दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचा मारा या पाणबुडीवरून करता येणार आहे. याच श्रेणीतील आयएनएस अरिघात ही पाणबुडी गेल्यावर्षी नौदलात समाविष्ट करण्यात आली होती.

पंतप्रधान मोदी महायुतीच्या आमदारांशी करणार चर्चा- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मुंबईतील दौऱ्यात महायुतीच्या आमदारांशी संवाद साधणार आहेत. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीच्या लोकप्रतिनिधींना रिपोर्ट कार्ड कसे बनवायचे? महाराष्ट्राच्या भविष्यातील विकासासाठी कशा सूचना द्यायच्या, याबद्दल संबंधित आमदारांना सूचना देण्यात आल्या आहेत. महायुतीच्या एका वरिष्ठ नेत्यानं सांगितले की, “राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना आणि पाच वर्षांसाठी त्यांचा रोडमॅप कसा राबवायचा, याबद्दल महायुतीचे आमदार माहिती तयार करणार आहेत. तसेच सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीची स्थिती, आमदारांशी संबंधित मतदारसंघातील कल्याणकारी आणि विकास योजनांच्या लाभार्थ्यांची सध्याची आर्थिकसह सामाजिक परिस्थितीची माहितीदेखील सादर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नियमितपणे मतदारांशी कसा संवाद ठेवण्यात येतो? संवादासाठी कोणत्या पद्धतीनं धोरण आखण्यात येते? याची माहितीदेखील तिन्ही पक्षांच्या आमदारांना द्यावी लागणार आहे”.

महायुतीच्या आमदारांशी संवाद साधल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबईतील इस्कॉन श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचे उद्घाटनही करणार आहेत. नऊ एकरांवर पसरलेल्या या प्रकल्पात अनेक देवतांच्या देवतांचे मंदिर, वैदिक शिक्षण केंद्र, प्रस्तावित संग्रहालय, सभागृह आणि उपचार केंद्र यांचा समावेश आहे.

### राज्यातील शाळांसाठी सीबीएसई पॅटर्न

राज्यातील अनेक शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. यापुढं राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत लावणं सक्तीचं असल्याचे भुसे म्हणाले. मराठी भाषा प्रत्येक शाळात शिकवणं सक्तीचं असल्याचेही भुसे यांनी म्हटले.

**मुख्यमंत्र्यांनी काय केल्या सूचना**

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये शिकविण्यावर भर द्यावा.

शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना घडविणारे उत्कृष्ट शिक्षक ही मोठी संपत्ती आहे, त्यांचा इतरांसाठी आदर्श म्हणून उपयोग करा.

पूर्व प्राथमिक शिक्षणाची नोंदणी करून त्यांना कमीत कमी कोणत्या बाबी आवश्यक असाव्यात हे सांगून त्यांना प्रमाणपत्र द्या, पालकांचा विश्वास रहावा यासाठी हे प्रमाणपत्र त्यांनी दर्शनी भागात लावण्याची अट असावी.

समूह शाळा ही अतिशय महत्त्वपूर्ण आणि आवश्यक बाब आहे. तथापि, कमी संख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना समूह शाळांमुळे होणारे लाभ योग्य प्रकारे समजावून सांगा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### आनंदवन येथील संस्थेला उपमुख्यमंत्री...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने दखल घेऊन केलेल्या या कार्यवाहीमुळे थोर समाजसेवक दिवंगत बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी ७५ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या महारोगी सेवा समितीसमोरील आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी कुष्ठरुग्णांच्या सेवेसाठी ७५ वर्षांपूर्वी ७९४९ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा तालुक्यातील आनंदवन येथे महारोगी सेवा समितीची स्थापना केली आहे. संस्थेचं यंदा अमृतमहोत्सवी वर्ष असून संस्था आर्थिक अडचणीत असल्याची बाब संस्थेचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या लक्षात आणून दिली. डॉ. विकास आमटे यांच्या मागणीची तातडीने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संस्थेस ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. त्यानुसार तातडीने कार्यवाही करीत हा निधी संस्थेस वितरीत करण्यात आला.

थोर समाजसेवक बाबा आमटे आणि साधनाताई यांनी स्थापन केलेली ही संस्था गेली ७५ वर्षे सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून कुष्ठरुग्णांचे उपचार, पुनर्वसनाच्या माध्यमातून त्यांची सेवा करत आहे. संस्थेतर्फे ग्रामीण भागांतील प्रकल्पांत पुनर्वसित दीड हजार कुष्ठरोग मुक्त दिव्यांग-निराधार ,वृद्ध, अनाथ, परित्यक्ता, मानसिकदृष्ट्या अपंग बांधवांची आणि त्यांच्या मुलांची काळजी घेतली जाते. विशेष शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रात निवासी तीनशे दिव्यांग विद्यार्थी-प्रशिक्षणार्थींना शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनिवासी विज्ञान, कला, वाणिज्य शाखेच्या साडेतीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोयही संस्थेमार्फत केली जात आहे. संस्थेच्या या सामाजिक बांधलकी आणि सेवाकार्याची दखल घेत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी राज्य शासनाकडून देय ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी संस्थेस तत्काळ वितरीत केला आहे.

### खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना...

**रोजगार निर्मिती हा देखील उद्देश**

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, खासगी प्रवासी वाहतूक कंपन्यांसंदर्भात केंद्र सरकारने आणलेल्या धोरणाचा अभ्यास करून, या कंपन्यांना एकाच परिवहन नियमाअंतर्गत एकत्रित आणणे गरजेचे आहे. प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे. सर्व प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांअतर्गत चारचाकी, बाईक, टॅक्सी यांचा समावेश करण्यात येणार आहे. बाईक चालविण्यासाठी महिला चालकांनाही प्राधान्य देण्यात यावे, जास्तीत जास्त रोजगार कसा निर्माण करता येईल यासाठी प्राधान्य द्यावे. तसेच त्यांच्या सुरक्षेसंदर्भात कंपन्यांनी उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिल्या.

खासगी वाहतूक व्यवस्था, सुस्थितीत असलेली वाहने, प्रवाशांची सुरक्षा, हेल्मेट, महिला चालकांची सुरक्षा, तत्पर सेवा इत्यादी बाबींचा वाहतूक धोरणात समावेश करण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी केले.

एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात ‘एसटी’च्या जागेवर २५ तर

**बोरिवलीत १०० खाटांचे रूग्णालय उभारणार**

राज्यातील अनेक बसस्थानके बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या तत्वावर विकसित करण्यात येत आहेत. एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी या ‘एस. टी.’च्या प्रकल्पात प्रत्येक जिल्ह्यात २५ तर मुंबईतील बोरिवली येथील जागेवर १०० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रूग्णालयात एस. टी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील, तसेच पाच लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा खर्च राज्यशासन करेल, असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.

सध्या राज्यभरात विविध ठिकाणी बांधा - वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर ‘एसटी’च्या जागांचा विकास केला जात आहे. भविष्यात या रुग्णालयांमध्ये ‘एसटी’ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतील. पुणे, कोल्हापूर, पुसद, वाशिम येथे रूग्णालय उभारण्यासंदर्भातील सादरीकरण करण्यात आले.

### वाल्मिक कराडला मकोका, १४ दिवसांची...

तसंच न्यायालयीन कोठडी दिली आहे. आतापर्यंतच्या तपासात दुसऱ्या गुन्ह्यात तपास करायचा आहे, असं सांगण्यात आलं. मात्र तपासात कुठंही वाल्मिक कराडचा सहभाग आढळला नाही, हे आम्ही कोर्टाला सांगितलं आहे”, असं वाल्मिक कराडचे वकील सिद्धेश्वर ठोंबरे यांनी सांगितलं.

आज जो न्यायालयात युक्तीवाद झाला त्यामध्ये सीआयडीच्या दुसऱ्या तपासणीसाठी पुन्हा वाल्मिक कराडला ताब्यात घेतलं आहे. वाल्मिक कराडचा या प्रकरणाशी कुठलाही संबंध नाही. बुधवारी त्यांना कोर्टात हजर केलं जाईल, त्या गुन्ह्याचा कुठेही संबंध नाही. हे ओढून ताणून गुन्हा लावणं चुकीचं आहे. त्यांची सर्व कागदपत्रे आम्हाला मिळू द्या. आम्ही तुम्हाला त्याची पुढची दिशा काय आहे ते सांगू. त्यासंदर्भात आमच्याकडं कुठलेही कागदपत्रे नाहीत. त्याच्यामध्ये रिमांड मिळेल आम्ही ते न्यायालयाकडं सादर करू. यामध्ये २९ डिसेंबर २०२४ ला त्यांनी खंडणी मागितल्याचा दावा त्यांनी केला. यामध्ये कुठंही वाल्मिक कराड यांनी खंडणी मागितल्याचं दिसून आलेलं नाही. वाल्मिक कराडचं या गुन्ह्यामध्ये कुठलंही नाव नाही. यामध्ये आम्हाला कुठलीही माहिती दिली जात नाही. वाल्मिक कराडला उद्या न्यायालयात हजर करतील, त्याबाबत आम्ही पुढची कारवाई काय करायची ते ठरवू.

**सिद्धेश्वर ठोंबरे, वाल्मिक कराडचे वकील**

संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना पूर्ण झाला. मात्र, अजूनही एक आरोपी फरार आहे. तर वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी धनंजय देशमुख यांनी केलीय. यानंतर आज धनंजय देशमुख यांनी पाण्याच्या टाकीवर चढून ‘शोले स्टाईल’ आंदोलन केलं. यावेळी मनोज जरांगे पाटील, खासदार बजरंग सोनवणे, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत घटनास्थळी उपस्थित होते.

### राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाचे मुख्यमंत्री देवेंद्र...

या कार्यक्रमास मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाउंडेशनचे सह संस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर,व्हेंचर कॅपिटल अँड स्टार्ट अप्स गुगलचे जागतिक प्रमुख अपूर्वा चमरिया, स्थानिक सरकार आणि शिक्षण AWS चे प्रमुख, राज्य अजय कौल, ईव्ही कॅप वेंचर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय पार्टनर विक्रम गुप्ता,अवेंडसचे सह-संस्थापक आणि कार्यकारी उपाध्यक्ष राणू वोहरा, इनक्युबेशन MGB इनोव्हेशन फाउंडेशन पार्टनर अध्यक्ष JITO जिनेंद्र भंडारी,व्हेंचर कॅटालिस्ट अँड नाईन युनिकॉर्नचे सह-संस्थापक अपूर्व रंजन शर्मा, ब्लू स्मार्टचे सह-संस्थापक पुनीत गोयल,रेनट्री फाउंडेशनच्या संस्थापक आणि संचालिका लीना दांडेकर, ओपन सीक्रेटच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अहाना गौतम, चलो मोबिलिटीच्या सह संस्थापक आणि संचालक प्रिया सिंग, जिओ जेन नेक्स्टच्या प्रमुख अमेय माशेलकर, सुपर बॉटम्सच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी उतगी, अस्थिरोग तज्ज्ञ आणि कलाकार सलोनी पटवर्धन इ. मान्यवर उपस्थित राहुन आपल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण करणार आहेत.

दिवसभरात होणार विविध पॅनेल चर्चा : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

कौशल्य विकास मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा म्हणाले की, दिवसभरात होणाऱ्या पॅनेल चर्चांमध्ये गुंतवणूकदारांच्या गरजा आणि युवा उद्योजकांच्या यशकथा यावर विशेष सत्रे आयोजित केली जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ जानेवारीला राष्ट्रीय स्टार्टअप दिन घोषित केला आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाज माध्यमांवरही कार्यक्रम थेट प्रक्षेपित केला जाणार आहे.

एक दिवसीय कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, कौशल्य विकास आयुक्त प्रदीपकुमार डांगे यांनी केले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमाची...

यावेळी आयुक्तांनी विशेषत: कोकण भवन इमारतीच्या परिसराच्या व कार्यालयांच्या सखोल स्वच्छतेचे निर्देश दिले. कार्यवाहीतील जप्त साहित्य, वाहन आदी पडून असल्यास त्यांच्या निर्लेखनाची कार्यवाही करणे, इमारतीच्या आतील बाजूस आणि दर्शनी भागात लावण्यात आलेले माहिती फलक अद्यावत करणे, अभ्यागतांसाठी पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतेची योग्य सुविधा, अभ्यागत कक्षांची व्यवस्था अद्यावत करणे यासर्व बाबींवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. यासर्व कामांचा साप्ताहिक आढावा घेण्यात येईल अशा सूचनाही आयुक्त डॉ. देशमुख यांनी यावेळी दिल्या.

### वाहतूककोंडीत पुणे जगात चौथ्या तर देशात...

गेल्यावर्षी १० किमी अंतर कापण्यासाठी कोलकातामधील चालकांना सरासरी ३४ मिनिटे, ३३ सेकंदांचा कालावधी लागत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याच अंतरासाठी बंगळुरूत सरासरी ३४ मिनिटे आणि १० सेकंदांचा वेळ लागतो नोंदवला आहे.

**पुणे तिसऱ्या स्थानी**

भारतात कोलकाता, बंगळुरूनंतर पुण्याचा क्रमांक लागतो. पुण्याचा सरासरी १० किमीसाठी ३३ मिनिटे आहे. तर तिन्ही शहरांचा समावेश जागतिक गर्दीच्या शहरांमध्येही होतो. कोलकाता जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर बंगळुरू आणि पुणे यांनी २०२४ मध्ये सरासरी १८ किमी प्रतितास वेगाने १० किमी अंतर कापण्यासाठी ३३ मिनिटे आणि २२ सेकंदांचा प्रवास असल्याने अनुक्रमे तिसरे आणि चौथे स्थान मिळवले.

**दिल्लीमध्ये लागतात २३ मिनिटे**

हैदराबाद, चेन्नई आणि मुंबई या शहरांमध्ये गर्दी वाढत असून, शहरांत १० किमी प्रवासासाठी अनुक्रमे ३२ मिनिटे, ३० मिनिटे आणि २९ मिनिटे लागतात. तर अहमदाबाद आणि एर्नाकुलममध्ये १० किमीसाठी २९ मिनिटे लागतात. तर जयपूरला २८ मिनिटे लागतात. तर राजधानी दिल्लीमध्ये १० किमी प्रवासासाठी २३ मिनिटे लागतात.

**देशात तिसऱ्या, जगात चौथ्या स्थानी**

पुण्यातील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून, त्याचा परिणाम वाहतूक वेगावर होत आहे. यामध्ये सर्वात मंद वाहतुकीत पुण्याचा क्रमांक देशात तिसरा आणि जगामध्ये सर्वात जास्त गर्दीचे शहर म्हणून चौथ्या कमांकावर आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ‘अभिजात भाषेला आधुनिक भाषा करण्याचे मोठे आव्हान मराठी भाषकांसमोर आहे’ - डॉ. निर्मोही फडके

## ठाणे महानगरपालिकेत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन




**ठाणे (रोहित जैसवार) :** एक मराठी भाषक म्हणून आपण आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगून ही भाषा जास्तीत जास्त टिकण्यासाठी लक्ष्य निर्धारित करून वाटचाल करायला हवी. आपल्या कणाकणात मराठीचा अभिमान जाणवायला हवा. अभिजात भाषेला आता आधुनिक भाषा करण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे, असे प्रतिपादन डॉ. निर्मोही फडके यांनी ‘जगू मराठीचे रंगी’ या विषयावरील व्याख्यानात केले. ठाणे महापालिका मुख्यालय येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या उद्घाटन डॉ. फडके यांच्या व्याख्यानाने झाले.

राज्यभरात १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२५ हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा केला जात आहे. त्यानिमित्ताने ठाणे महानगरपालिकेतही विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवड्याचे उद्घाटन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी आणि डॉ. निर्मोही फडके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून मंगळवारी सकाळी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे करण्यात आले. त्यानंतर, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी डॉ. निर्मोही फडके यांचे ‘जगू मराठीचे रंगी’ या विषयावर व्याख्यान झाले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच मिळाला आहे. त्यामुळे हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अधिक उत्साहाने साजरा करण्याचा योग आला आहे. आपली भाषा ही रांगडी भाषा आहे. संतानी आपल्या नसानसात रुजवलेली भाषा आहे. त्यामुळे काहींच्या मनात भाषेच्या भवितव्याविषयी व्यर्थ चिंता आहे. आपली भाषा शतकानुशतके टिकणारी आहे. त्या भाषेचा प्रवाह वाहता ठेवून तीला आणखी समृद्ध करण्याची जबाबदारी आपली आहे, असे प्रतिपादन या पंधरवड्याचे उद्घाटन करताना ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी केले.

डॉ. निर्मोही फडके यांनी व्याख्यानाच्या पूर्वाधात मराठीच्या आजवरच्या वाटचालीचा धांडोळा घेतला. अभिजात भाषेचा अर्थ त्यांनी श्रोत्यांशी संवाद साधत उलगडून दाखवला. त्याच जोडीने मराठीच्या व्याकरणाचे सोपे नियम समजावून सांगितले. शासकीय कामकाजातील सतत वापरल्या जाणाऱ्या शब्दांची उदाहरणे देत त्यांनी मराठी, संस्कृत शब्दांच्या गंमती जमतीही सांगितल्या. तर, उत्तरार्धात आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग असलेल्या मराठी भाषेला पुढील पिढीकडे समर्थपणे सोपवण्याची जबाबदारी आपली आहे. त्यासाठी आपण आज या संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने संकल्प करूया, असे आवाहन डॉ. फडके यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता करताना उपायुक्त उमेश बिरारी यांनी भाषेच्या वापराबदद्लची सजगता आणि आग्रह यांचे विवेचन केले. तसेच, पंधरवड्याच्या काळात होणाऱ्या कार्यक्रमांची रुपरेषाही स्पष्ट केली. प्राजक्ता जोशी यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. राजेंद्र पाटणकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी सुवर्णसंधी

**ठाणे (सम्यक कासारे)-** जेष्ठ नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. हे लक्षात घेऊन जोशी - बेडेकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने ‘ गाणे गात चलावे’ या अभिनव अभ्यासक्रमाचे आयोजन केले आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत द्वितीय वर्षासाठी एंगेजमेंट कम्यूनिटी प्रोग्राम ( Community engagement program ) हा नवीन विषय सुरू झाला आहे. या अंतर्गत विद्या प्रसारक मंडळ संचलित के. ग .जोशी कला व ना.गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय( स्वायत्त),ठाणे, येथील राज्यशास्त्र विभागातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी (६५ वर्षे आणि पुढे) दहा दिवसाचा विशेष अभ्यासक्रम आयोजित करण्यात येणार आहे.या प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी गरजेचे असलेले योग, आध्यात्मिक,कायदेशीर, सायबर गुन्हेगारी संबंधी जागरूकता, आर्थिक गुंतवणूक , आरोग्य व डायट विषयीची जागरूकता,भावनिक संबंधांची जपणूक यासंबंधीचे मार्गदर्शन तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विवीध आनंददायी उपक्रम या सर्वांचा समावेश असेल. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम मंगळवार २१ जानेवारी ते शुक्रवार ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळात महाविद्यालयात घेण्यात येईल. यासंदर्भातील अधिक माहितीसाठी डॉ. प्रियंवदा टोकेकर ९९६७६४८८६४, श्री.स्वप्नील मयेकर ९९२००८५८३७ यांच्याशी संपर्क साधावा.

## साहित्यिकांनी मानवता जपली पाहिजे - ज्येष्ठ साहित्यिक राजीव जोशी

**कल्याण (गणेश बागडे) :** प्रत्येक माणसाचं जीवन ही लिखाणाची प्रेरणा आहे. काचेच्या घरात राहून साहित्यिक होता येत नाही. कवींनी समकालाचा वेध घ्यावा. साहित्यिकांनी मानवता जपून मौलिक लेखन करणं गरजेचं आहे असे मोलाचे मार्गदर्शन ज्येष्ठ कवी राजीव जोशी यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण, कल्याण डोंबिवली महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा. भावे व्याख्यानमाले अंतर्गत “वाचन संकल्प महाराष्ट्राच्या” या उपक्रमातील साहित्यिक मेळाव्यात उपस्थित साहित्यिकांना केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे




म्हणुन ज्येष्ठ साहित्यिक जनार्दन ओक उपस्थित होते. मराठी साहित्यात कल्याण शहरातील साहित्यिकांचे मोलाचं योगदान आहे. अशा कर्मभूमी व जन्मभूमी असणाऱ्या चिंतामणराव वैद्य, वि.आ.बुआ,अंबादास अग्निहोत्री, भालचंद्र रेढे, माधवी गोगटे, दि. बा.मोकाशी, कविवर्य माधवानुज, श्रीराम साठे, कृष्णराव धुळप, रामभाऊ कापसे, माधव आचवल, गोपाळराव टिकेकर, मधु सोमठणकर अशा अनेक कल्याण येथील ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकांचा मागोवा वाचनालयाचे विश्वस्त ॲड. सुरेश पटवर्धन यांनी घेतला.

आपणच आपली ओळख विसरत चाललो आहोत. याकरीता कल्याणातील दिवंगत साहित्यिकांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात डॉक्युमेंटेशन होण आवश्यक आहे असे मत चिटणीस माधव डोळे यांनी मांडले. वाढत्या सोशल मिडीयाच्या वापरामुळे अगदी जवळचे साहित्यिकही व्हॉट्सॲप व फेसबुकच्या माध्यमातून एकमेकांना ओळखतात म्हणूनच सर्व साहित्यिकांनी एकत्र जमून आपले साहित्यिक योगदान वाढविण्याकरिता वाचनालयाच्या माध्यमातून प्रथमच या आगळा वेगळ्या साहित्यिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे असे मत सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी मांडले.

## ठाणे जिल्हा परिषदेच्या केंद्र प्रमुखांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर

**ठाणे (विशाल पाटील) -** जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील १४ केंद्र प्रमुखांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आले असून त्यातील ३ सेवानिवृत्त केंद्र प्रमुख यांना देखील लाभ मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली शिक्षकांना विविध लाभ देणे बाबत विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे.

शिक्षण प्राथमिक विभागातील केंद्र प्रमुख म्हणून एका पदावर १२ वर्ष सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी करत असल्याने शिक्षण विभागातील १४ केंद्र प्रमुख यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## राष्ट्रीय युवा दिन उत्साहात संपन्न !



**वासिंद (सचिन कदम) -** येथील स्वामी विवेकानंद संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय युवा दिन उत्साहात संपन्न झाला. स्वामी विवेकानंद संस्थेचा २८ वा वर्धापन दिन आणि स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती तसेच राष्ट्रीय युवा दिनाचा कार्यक्रम शहापूर तालुक्यातील मौजे पाली येथील संस्थेच्या कार्यालयात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

मानव सेवा विकास फाऊंडेशन, अमरावती या संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक व माजी प्राचार्य व्ही. एस.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी वाडा तालुक्यातील एस.जी. देशमुख शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर देशमुख, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी व्यवस्थापक व विशेष वसुली अधिकारी काशिनाथ तारमळे, स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष सुनील म्हसकर, उत्कर्ष महाविद्यालयाचे माजी सेक्रेटरी अरुण भालेकर, लायन्स क्लब ऑफ शहापूरचे सेक्रेटरी मुकेश दामोदरे, वासिंद येथील कम्प्लिट कॉम्प्युटर एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संचालक विनायक पवार, वासिंद चॅलेंजर्स ट्रेकर्सचे संचालक श्याम शेलार, ग्रामस्थ शारदाबाई म्हसकर, दर्शना व प्रगती म्हसकर, वैशाली भोईर संकेत तरणे, सलोनी तरणे, विद्या म्हसकर, जीवन म्हसकर, युवा कार्यकर्ते ओंकार देशमुख, अजित दुधाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थेने आजतागायत विविध क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य व संस्थेच्या भविष्यातील योजना आदी बाबींवर प्रकाश टाकत संस्थाध्यक्ष सुनील म्हसकर यांनी प्रास्ताविक सादर केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही. एस.पाटील यांनी “राष्ट्र उभारणीत तरुणांचा सिंहाचा वाटा असतो. देशाचा विकास करून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची ताकद युवकांत आहे. तरुण हे देशाचे बिल्डिंग ब्लॉक्स आहेत. त्यामुळेच आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात युवापिढीने राष्ट्रविकासासाठी झोकून काम करण्याची नितांत गरज आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीनेही आपल्या देशाच्या विकासासाठी झटले पाहिजे असे मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

यासाठी संस्थेचे सचिव संजय तरणे, सहसचिव तथा पोलीस पाटील साईनाथ तरणे, पदाधिकारी अनंता तरणे, गीतांजली म्हसकर, रसिका म्हसकर, शर्वरी तरणे, अनिल म्हसकर, कैलास म्हसकर आदिंनी परिश्रम हाती घेतले.

## विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवण्यासाठी वाचन उपक्रम

### कल्याणच्या अग्रवाल महाविद्यालयात झाला अनोखा वाचन उपक्रम

**कल्याण (आकाश कांबळे) :** एकीकडे मोबाईलमुळे वाचनाची कमी झालेली सवय पुन्हा रुजवण्यासाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी कल्याणच्या के.एम. अग्रवाल महाविद्यालयात अनोखा वाचन उपक्रम राबवण्यात आला. ज्यामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांसह विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



मोबाईलच्या केवळ वापराचे नव्हे तर अतिवापराचे अनेक दुष्परिणाम दिसू लागले आहेत. ज्यामध्ये शारीरिक, मानसिक आणि त्याचसोबत सामाजिक धोकेही समोर येऊ लागले आहेत. या सामाजिक धोक्यांपैकीच एक आणि सर्वात महत्त्वाचा असणारा म्हणजे लोकांचे कमी झालेलं वाचन आणि परिणामी लोप पावत चाललेली आपली वाचन संस्कृती. आपल्या समाजाच्या प्रगल्भतेला, विचारांना योग्य ती दिशा देण्याचे काम आतापर्यंत या वाचन संस्कृतीने केले आहे. मात्र माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचंड रेट्यात ही वाचनाची आवड आणि संस्कृती काहीशी घसरली आहे.

नेमका हाच धागा पकडून कल्याणातील के. एम. अग्रवाल महाविद्यालयात "वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत प्राध्यापक आणि अनेक विद्यार्थ्यांचा सामूहिक वाचन उपक्रम राबवण्यात आला. ज्यामध्ये अग्रवाल महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेची अनेक नामांकित लेखकांची दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. अग्रवाल महाविद्यालयातील एफ.वाय, एस.वाय, टी.वायचे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, सेल्फ फायनान्स विषयाच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सतत मोबाईल फोन वापरणारी ही युवा पिढी आज पुस्तक वाचानांमध्ये एकदम दंग झाली होती.

पुस्तक वाचनाचा हा आनंद खरोखर अतिशय निर्मळ असल्याची प्रतिक्रिया या विद्यार्थ्यांनी दिली. तर विद्यार्थ्यांमध्ये ही वाचनाची आवड रुजविण्यासाठी के.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता मन्ना यांच्या पुढाकाराने असेच विविध उपक्रम यापुढेही सुरू राहणार असल्याची माहिती उपप्राचार्य डॉ. अनघा राणे यांनी दिली. तसेच महाविद्यालयामध्ये व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने वाचन कट्टा हा उपक्रम राबवण्याचा मानस आहे, त्यादृष्टीनेही येत्या काळात विविध कार्यक्रमांची आखणी केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### टिळकनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ डोंबिवली ( पूर्व ) आयोजित मकरोत्सव २०२५

## यंत्रात न अडकता प्रतिभेचा मंत्र जपून सादर करणाऱ्या दिग्गज वादकांना आजच्या प्रतिभावान कलाकारांनी दिली मानवंदना

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) -** टिळकनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित मकरोत्सव २०२५ या सांस्कृतिक सोहळ्याच्या प्रथम पुष्पात अवनी क्रिएशन्स आणि रघुलीला एंटरप्राइजेस निर्मित “स्वरा मी वंदिले” या नाट्यसंगीतातील थोर वादक कलाकारांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नाट्यसंगीत ह्या मराठी साहित्यातील अत्यंत महत्वाच्या आणि अजरामर संगीत क्षेत्रातील दिग्गज गायक कलाकारांचे स्मरण विविध नाट्यपदे ऐकताना केले जाते. परंतु ह्या नाट्यगीतांना अजरामर करताना दिग्गज गायकांना तेवढीच मोलाची साथसंगत करणाऱ्या वादक कलाकारांचाही मोलाचा वाटा आहे. “स्वरा मी वंदिले” या कार्यक्रमाद्वारे अशाच दिग्गज आणि प्रतिभावान वादक कलाकारांना आजच्या काळातील प्रतिभावान वादक आणि गायकांनी आपल्या सादरीकरणातून मानवंदना दिली. सुमारे ७००-७५० रसिक डोंबिवलीकरांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या या कार्यक्रमामध्ये सहभागी गायकांनी विविध नाट्यपदांचे सादरीकरण करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

गोविंदराव पटवर्धन, तुळशीदास बोरकर, अहमदजान थिरकवा, गोविंदराव टेंबे, उस्ताद झाकीर हुसैन या आणि अशा अनेक वादकांनी अजरामर केलेल्या गीतांचा या कार्यक्रमात समावेश होता. या कार्यक्रमात केतकी चैतन्य, धनंजय म्हसकर, ऋषिकेश




बडवे, सृष्टी कुलकर्णी या गायकांनी सहभाग घेतला तर रामकृष्ण करंबेळकर, निरंजन लेले, श्रुती भावे यांनी साथ केली.पारंपरिक नांदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर केतकी चैतन्य हिने नाथ हा माझा या गाण्याद्वारे बालगंधर्व आणि वादकांना मानवंदना दिली. ऋषिकेश बडवे यांनी मानापमान चित्रपटातील रवि मी , युवतीमना ही गाणी सादर केली. सृष्टी कुलकर्णी हिच्या सोहम हर डमरू बाजे या गीताला रसिकांनी वन्स मोअर ने दाद दिली. निरंजन लेले आणि श्रुती भावे चितळे यांच्या ऑर्गन व्हायोलिन जुगलबंदीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची संकल्पना आदित्य बिवलकर यांची होती तर अनघा मोडक यांनी आपल्या निवेदनाद्वारे वेगवेगळ्या वादकांचे चरित्रपट उलगडले.

गतवर्षी अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या टिळकनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने अमृतोत्सव या सहा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या श्रृंखलेतून केलेल्या निधी संकलनातून हम चैरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून जम्मू येथील दोन शाळांना प्रयोगशाळा उभारून देण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रातील या महत्वाकांक्षी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनानंतर मंडळाने यंदाच्या वर्षात देखील आणखी काही शैक्षणिक उपक्रम करण्याचे ठरविले आहे. मकरोत्सवातील या प्रथम पुष्पात मंडळाचे अध्यक्ष श्री सचिन आंबेकर आणि कार्यवाह श्री संजय शेंबेकर यांनी या उपक्रमाची घोषणा केली आणि विशेष म्हणजे कार्यक्रमाच्या मध्यांतरापर्यंत या उपक्रमाकरिता मंडळास देणगी मिळाल्याचेही त्यांनी जाहीर केले.

या उपक्रमांतर्गत डोंबिवलीतील विविध शाळांमधील आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना विविध प्रकारची शैक्षणिक मदत करण्यात येणार असल्याचे श्री आंबेकर यांनी सांगितले. तसेच या उपक्रमाकरिता अधिकाधिक नागरिकांनी सहकार्य करावे अशी विनंती श्री शेंबेकर यांनी उपस्थितांना केली.

# श्रद्धा कपूरच्या मोबाईल वॉलपेपरवरील 'ती' व्यक्ती कोण?





२०२४ मध्ये श्रद्धा कपूर केवळ 'स्त्री २' च्या प्रचंड यशामुळेच नव्हे, तर पटकथा लेखक राहुल मोदीबरोबरच्या तिच्या कथित नात्यामुळेही चर्चेत आली होती. गेल्या काही काळापासून श्रद्धा आणि राहुल डेटिंगमुळे चर्चेत आहेत. अनेकदा एकत्र दिसल्यामुळे तसेच श्रद्धाने सोशल मीडियावर राहुलबरोबरचे फोटो शेअर केल्यामुळे या चर्चांना उधाण आले. अलीकडेच श्रद्धाचा मोबाईल वॉलपेपरचा एक फोटो व्हायरल झाला, ज्यामुळे त्यांच्या नात्याविषयी पुन्हा चर्चा रंगल्या आहेत.

गेल्या आठवड्यात श्रद्धा पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली, तेव्हा तिने कॅज्युअल पोशाख घातला होता. गुलाबी जॅकेट, निळ्या लेगिंग्सवर तिने केस बांधलेले होते. तिच्याबरोबर एक काळ्या रंगाची जिम बॅग होती आणि ती कारमध्ये जाताना दिसली.

कारचा दरवाजा उघडताना, तिच्या फोन स्क्रीनची एका क्षणासाठी झलक पाहायला मिळाली. त्यावर एक वॉलपेपर होता, ज्यामध्ये ती आणि एक व्यक्ती एकमेकांजवळ उभे आहे असे त्या फोटोमध्ये दिसते आहे. यावरून चाहत्यांनी लगेचच अंदाज लावला की तो व्यक्ती राहुल मोदीच आहे, जो श्रद्धाचा कथित बॉयफ्रेंड असल्याचे म्हटले जात आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये श्रद्धाने राहुलबरोबरच्या एका आऊटिंगचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. त्या फोटोमध्ये वडा पावची प्लेट दिसत होती, ज्यावर तिने कॅप्शन लिहिले होते, "मी नेहमी तुला वडा पाव खायला नेण्यासाठी त्रास देत राहू का?"

श्रद्धाने या चर्चांवर कोणतेही भाष्य केलेले नाही, परंतु 'कॉस्मोपॉलिटन'ला दिलेल्या मुलाखतीत तिने अप्रत्यक्षरीत्या तिच्या नात्याबाबत संकेत दिले होते. तिने सांगितले, "मला माझ्या जोडीदाराबरोबर वेळ घालवायला खूप आवडतं, मग ते सिनेमा पाहणं असो, डिनरला जाणं असो किंवा प्रवास करणं असो. मला माझ्या जोडीदाराबरोबर एकत्र वेळ घालवणं किंवा अगदी काहीच न करता बरोबर राहणंही खूप आवडतं." श्रद्धा आणि राहुल यांच्या नात्याबाबतची चर्चा २०२४ च्या सुरुवातीला सुरू झाली, जेव्हा ते अनेक कार्यक्रमांमध्ये, तसेच एका मित्राच्या लग्नात एकत्र दिसले होते. राहुल मोदी हे 'तू झूठी मैं मक्कार' या चित्रपटाचे पटकथा लेखक आणि सहाय्यक दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत, ज्यामध्ये श्रद्धा आणि रणबीर कपूर मुख्य भूमिकेत होते.


कामाच्या आघाडीवर, श्रद्धाने नुकताच 'स्त्री २' या चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा केला. हा चित्रपट २०१८ च्या तिच्या हिट हॉरर-कॉमेडी 'स्त्री'चा सिक्वेल होता, ज्यामध्ये ती राजकुमार रावबरोबर झळकली होती. तिच्या पुढील चित्रपटाच्या घोषणेची चाहत्यांना प्रतीक्षा असली तरी, सध्या श्रद्धा तिच्या वैयक्तिक आयुष्यात चांगला वेळ घालवत आहे.

# 'लाखात एक आमचा दादा'मध्ये मारामारीच्या सीनचे 'असे' झाले शूटिंग

सूर्यादादा म्हटलं की, बहिणींसाठी कायम खंबीरपणे पाठीशी असणारा, तुळजावर नितांत प्रेम करणारा, वडिलांची काळजी घेणारा, मित्रांची साथ देणारा, असे व्यक्तिमत्त्व नकळत प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर येते. लाखात एक आमचा दादा या मालिकेतील सूर्यादादाचे हे पात्र आज घराघरांत पोहोचलेले दिसते. मालिकेबरोबरच पडद्यामागील काही क्षणही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसतात. सोशल मीडियावर अनेक शूटिंगदरम्यानचे सीन शेअर केले जातात. आता 'लाखात एक आमचा दादा' मालिकेतील एका ॲक्शन सीनचे शूटिंग कसे झाले, याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला गेला आहे.

**पडद्यामागचे क्षण...**

शंतनू शिंदे या अकाउंटवरून लाखात एक आमचा दादा मालिकेच्या शूटिंगचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये सूर्या मारामारी करताना



दिसत आहे. सत्यजितच्या घरासमोर तो त्यांच्या बॉडीगार्डबरोबर मारामारी करताना दिसतो. यावेळी त्याच्या चेहऱ्यावर रागाचे भाव दिसत आहेत. मालिकेत पाहायला मिळालेला हा जबरदस्त मारामारीचा सीन कसा शूट झाला, हे या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. हा व्हिडीओ शेअर करताना, मालिकेत सूर्याची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता नितीश चव्हाणलादेखील टॅग केले गेले आहे. या व्हिडीओवर अनेकांनी हार्ट इमोजी शेअर केल्याचे पाहायला मिळत आहे. 'लाखात एक आमचा दादा' मालिकेत दाखविल्याप्रमाणे, सूर्याची सर्वांत लहान बहीण भाग्याला तिच्या शाळेतील एक मुलगा त्रास देत होता. प्रोजेक्टच्या स्पर्धेसाठी गेल्यानंतर त्याने भाग्याचा व्हिडीओ रेकॉर्ड केला होता. महत्त्वाचे म्हणजे हा सत्यजितचा भाचा आहे. सत्यजितबरोबर तुळजाचे लग्न ठरले होते. भाग्याचा व्हिडीओ त्या मुलाने काढला होता, हे समजल्यावर सूर्या सरनोबतांच्या बंगल्यावर गेल्याचे पाहायला मिळत आहे. त्यादरम्यान, त्यांचे बॉडीगार्ड व सूर्या यांच्यात मारामारी झाल्याचे पाहायला मिळाले.


याबरोबरच, तुळजाला शत्रूविरुद्ध ठोस पुरावा मिळाला असल्याचेदेखील पाहायला मिळाले. शाळेत मुलांना जो पोषण आहार मिळतो, तो सूर्याच्या घरात बनवला जातो. तो आहार घेतल्यानंतर गावातील मुले आजारी पडली होती. त्यासाठी सूर्याला पोलिसांकडून अटक केली होती. आता सूर्याची जामिनावर सुटका झाली आहे. मात्र, पोषण आहारात शत्रूने कसलेतरी औषध टाकले होते, असा एक व्हिडीओ तुळजाच्या हाती लागला आहे. आता शत्रूला पोलिसांच्या हवाली करत सूर्याला तुळजा निर्दोष सिद्ध करू शकणार का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# रामचरणच्या 'गेम चेंजर' सिनेमाची आकडेवारी खोटी?

दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी अभिनेता राम चरणच्या नवीन चित्रपट 'गेम चेंजर'वर जोरदार टीका केली आहे आणि या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिसवर दाखवल्या जाणाऱ्या आकड्यांवर शंका उपस्थित केल्या आहेत. निर्मात्यांनी दावा केलेल्या आणि विविध ट्रेडने अहवाल दिलेल्या चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये मोठा फरक असल्याचे दिसून आले आहे.सोमवारी संध्याकाळी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर राम गोपाल वर्मा यांनी उपरोधाने लिहिले, "एस एस राजमौली आणि सुकुमार यांनी तेलुगू चित्रपटसृष्टीला रिअल टाइम कलेक्शनमधून प्रचंड उंचीवर नेलं आहे, ज्यामुळे बॉलीवूड हादरून गेलं. मात्र, 'गेम चेंजर' सिनेमाच्या लोकांनी हे सिद्ध केलं आहे की दाक्षिणात्य सिनेसृष्टी फसवणुकीत महान आहे.''वर्मा यांनी या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवर प्रश्न उपस्थित केले आणि लिहिले, "मला खरोखरच माहित नाही की या अत्यंत लज्जास्पद आणि मानहानीकारक फसवणुकीच्या मागे कोण आहे, ज्यामुळे 'बाहुबली', 'आरआरआर', 'केजीएफ २', 'कांतारा' यांसारख्या दक्षिणेकडील सिनेमांच्या उत्कृष्ट कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.''राम गोपाल वर्मा यांनी 'गेम चेंजर'चे निर्माते




दिल राजू यांना निर्दोष ठरवत लिहिले, "मला माहित नाही की या अविश्वसनीय आणि मूर्खपणाच्या खोट्या आकड्यांमागे कोण आहे, पण निश्चितपणे ते दिल राजू असू शकत नाहीत. कारण ते अतिशय नम्र आणि वास्तवात राहणारे आहेत आणि अशा प्रकारच्या फसवणुकीत ते सामील होऊ शकत नाहीत."'गेम चेंजर'च्या निर्मात्यांनी चित्रपटाने पहिल्या दिवशी १८६ कोटी कमावल्याचा दावा केला, हा सिनेमा १० जानेवारी २०२४ रोजी प्रदर्शित झाला होता. हा आकडा चित्रपटाच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर शेअर करण्यात आला. मात्र, ट्रेड अहवालानुसार चित्रपटाने जगभरात १०० कोटींच्या आतच कमाई केली आहे, तर काही अहवालांनुसार (उदा. सॅकनिल्क) या चित्रपटाने केवळ ८० कोटी कमावले आहेत.



## पूजा सावंतने पतीबरोबर ऑस्ट्रेलियात साजरी केली पहिली मकर संक्रात

मराठी अभिनेत्री पूजा सावंतने लग्नानंतरची पहिली मकर संक्रात ऑस्ट्रेलियात साजरी केली. तिने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर करून तिच्या मकर संक्रातीच्या सेलिब्रेशनची झलक दाखवली आहे. पूजाचे आई- वडील व भाऊ आणि बहीणदेखील ऑस्ट्रेलियात आहेत, त्यांच्याबरोबर पूजा व सिद्धेश चव्हाण यांनी पहिली मकर संक्रात साजरी केली आहे.

व्हिडीओत पूजा सावंत व सिद्धेश चव्हाण दोघेही संक्रांतीनिमित्त पारंपरिक काळ्या रंगाच्या पोशाखात दिसत आहेत. पूजाने काळ्या रंगाची पैठणी नेसली आहे, तर सिद्धेशने काळ्या रंगाचा कुर्ता घातला आहे. तसेच पूजाने पारंपरिक हलव्याचे दागिने घातले आहेत. व्हिडीओत दोघेही पूजा करताना दिसतात.

पूजाची आई तिला व सिद्धेशला ओवाळते, मग सिद्धेश सासूबाईंच्या पाया पडून आशीर्वाद घेतो. त्यानंतर पूजाचे आई-वडील लेक व जावयाबरोबर हसताना दिसतात. या व्हिडीओत पूजाची बहीण रुचिरादेखील दिसते. त्यानंतर सिद्धेश व पूजा पहिल्या संक्रांतीचं फोटोशूट करतात.

व्हिडीओत शेवटी हलव्याचे दागिने खाऊ शकतो का असं पूजा विचारते, त्यानंतर सिद्धेश ते खाण्याची ॲक्टिंग करताना दिसतो. पूजाचा हा पहिल्या मकर संक्रांतीचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे.

पूजाच्या या व्हिडीओवर अभिजीत खांडकेकर, अमृता खानविलकर यांनी कमेंट्स केल्या आहेत. पूजाच्या आई गीता सावंत यांनी रेड हार्ट इमोजी कमेंट्स केले आहेत. तर सिद्धेशच्या आई प्रिया चव्हाण यांनी 'मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा. पूजा व सिद्धू सुंदर दिसताय,' अशी कमेंट केली आहे.

पूजा सावंत व सिद्धेश चव्हाण यांच्याबद्दल बोलायचं झाल्यास दोघांनी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी लग्नगाठ बांधली. मोठ्या थाटामाटात या दोघांचा लग्नसोहळा पार पडला होता. सिद्धेश चव्हाण ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक आहे. तो ऑस्ट्रेलियातील एका फायनान्स कंपनीत कामाला आहे. लग्नानंतर साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढीपाडवा सण पूजा व सिद्धेशने ऑस्ट्रेलियात मराठी परंपरेनुसार साजरा केला होता. आता तिच्या पहिल्या संक्रांती सेलिब्रेशनची चांगलीच चर्चा होत आहे.

# ठरलं! १५ वर्षांनी येणार मराठी चित्रपट 'हुप्पा हुय्या'चा सिक्वेल, दिग्दर्शकाने केली घोषणा

२०१० मध्ये आलेल्या 'हुप्पा हुय्या' या मराठी चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तब्बल १५ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर बॉक्स ऑफिसवर गाजलेल्या आणि प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवलेल्या 'हुप्पा हुय्या' चित्रपटाचा सिक्वेल लवकरच येणार आहे. दिग्दर्शक समित कक्कड यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'हुप्पा हुय्या २' ची अधिकृत घोषणा करत चाहत्यांची उत्सुकता वाढवली आहे. पहिल्या भागातील दमदार कथेने आणि त्यातील व्हीएफएक्सच्या उत्कृष्ट वापराने प्रेक्षकांना भुरळ घातली होती.

मारुतीरायाने दिलेल्या शक्तीचा गावासाठी उपयोग करणाऱ्या हणम्याची ही गोष्ट अजूनही प्रेक्षकांच्या आठवणीत आहे आणि हीच आठवण पुन्हा ताजी करण्यासाठी दिग्दर्शक समित कक्कड यांचा 'हुप्पा हुय्या २' रसिक प्रेक्षकांसाठी पूर्वीपेक्षा भव्यदिव्य व स्टायलिश ट्रीटमेंटने सज्ज होणार आहे. चित्रपटाच्या लेखनाचे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच कलाकार आणि




तंत्रज्ञांची नावे जाहीर केली जाणार आहेत. दिग्दर्शक समित कक्कड आगामी चित्रपटाची घोषणा करत म्हणाले, ''हुप्पा हुय्या २' हा चित्रपट पहिल्या भागाप्रमाणेच प्रेक्षकांचे प्रेम आणि आशीर्वाद मिळवेल, असा विश्वास मला आहे.

आम्ही हा सिक्वेल तितक्याच उत्कटतेने आणि भव्यदिव्य पद्धतीने साकारणार आहोत'. 'हुप्पा हुय्या' या मराठी चित्रपटात सिद्धार्थ जाधव, गिरीजा ओक, उषा नाडकर्णी, गणेश यादव, मंगेश देसाई, मोहन जोशी, वैभव मांगले, कुशल बद्रिके या कलाकारांची मांदियाळी होती. आता दुसऱ्या भागात याच कलाकारांची वर्णी लागणार की नवीन कलाकार पाहायला मिळणार, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. 'रानटी', 'हाफ तिकीट', 'धारावी बँक', 'इंदोरी इश्क', 'आयना का बायना', 'आश्चर्यचकीत', '३६ गुण' या सारख्या वैविध्यपूर्ण चित्रपटांचे दिग्दर्शन करणाऱ्या समित कक्कड यांच्या या आगामी चित्रपटाबद्दल खूप उत्सुकता आहे. समित कक्कड फिल्म्स प्रस्तुत 'हुप्पा हुय्या २' ची निर्मिती अमर कक्कड, पुष्पा कक्कड आणि समित कक्कड हे करीत असून, संगीत-दिग्दर्शन अजित परब यांचे तर लेखन हृषिकेश कोळी यांचे आहे.'संकटात धैर्य, संघर्षात साहस आणि विजयात विनम्रता शिका' अशी मारुतीरायाची शिकवण मानणाऱ्या 'हुप्पा हुय्या २'च्या घोषणेनंतर या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

# ३ वर्षे बॉलीवूड अभिनेत्रीला केलं डेट, ब्रेकअपनंतर तिच्याच मैत्रिणीबरोबर थाटला संसार



रणबीर कपूर, करीना कपूर व करिश्मा कपूर यांच्या आत्याचा मुलगा अभिनेता आदर जैन गर्लफ्रेंड अलेखा अडवाणीबरोबर लग्नबंधनात अडकला आहे. गोव्यात आदर व अलेखा यांनी लग्न केलं. या सोहळ्याला नीतू कपूर यांच्यासह अनेकांनी हजेरी लावली होती. अलेखा व आदर यांच्या लग्नातील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

आदर जैन व अलेखा अडवाणी यांचा लग्नसोहळा १२ जानेवारी २०२५ रोजी गोव्यात पार पडला. आदरने लग्नासाठी ग्रे कलरचा सूट निवडला होता ज्यामध्ये तो खूपच डॅशिंग दिसत होता. तर अलेखा अडवाणी पांढऱ्या ऑफ शोल्डर गाऊनमध्ये खूपच सुंदर दिसत होती. अलेखाने मॅचिंग नेकलेस आणि कानातले घालून तिचा लूक पूर्ण केला होता. आदरने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीजमध्ये काही स्टोरी रिपोस्ट केल्या आहेत. त्यात अनेक फोटो व व्हिडीओंचा समावेश आहे. या फोटोंमध्ये हे जोडपे भरपूर रोमान्स करताना दिसत आहे. या जोडप्याच्या मित्रांनी त्यांच्या लग्नाच्या खास क्षणांची झलक त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. यातील एका व्हिडीओमध्ये आदर व अलेखा लिप लॉक करताना दिसत आहेत. आदर जैन हा अभिनेत्री तारा सुतारियाबरोबर २०२० ते २०२३ या काळात रिलेशनशिपमध्ये. दोघेही तीन वर्षे एकत्र होते, तारा आदरबरोबर कपूर कुटुंबाच्या प्रत्येक सेलिब्रेशनला असायची. आदरची होणारी पत्नी अलेखा ही तारा व आदर दोघांचीही चांगली मैत्रीण होती.




**मेष** – व्यावसायिक कामात चांगल्या परिणामाची शक्यता आहे. मानसिक ताणाच्या बाबतीत सावधगिरी बाळगावी.

**वृषभ** – घरातील वातावरण शांतीपूर्ण राहील. आरोग्य उत्तम राहील. खूप जोखमीचे निर्णय घेताना सावध राहा.

**मिथुन** – नवीन योजना राबवण्यासाठी उत्तम वेळ आहे. प्रेमसंबंधात समजूतदारपणे वागा. कामाच्या क्षेत्रात प्रगती होईल.

**कर्क** – व्यवसायात क्षुल्लक अडचणी येऊ शकतात. घरातील सदस्यांची मदत मिळेल. आरोग्याबाबत सुधारणा होईल.

**सिंह** – संयम आणि मेहनतीच्या जोरावर अपेक्षित यश मिळवाल. आपल्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होईल.

**कन्या** – प्रेमसंबंधात हळुवारता व समजूतदारपणा महत्त्वाचा ठरेल. कुटुंबीयांबरोबर वेळ घालवण्याची संधी मिळेल.

**तुळ** – कामात नवीन संधी येऊ शकतात. आरोग्याबाबत काही तक्रारी येतील, मात्र त्यावर उपचार घेणे आवश्यक आहे.

**वृश्चिक** – घरातील वातावरण सुखद असेल. आर्थिक बाबतीत सावध राहा. मानसिक ताणावर नियंत्रण ठेवा.

**धनु** – आपल्या व्यक्तिमत्त्वात तेजस्विता दिसेल. कामाच्या ठिकाणी चांगले निर्णय घेता येतील. प्रेम व सहकार्य वाढेल.

**मकर** – आपली आर्थिक स्थिती सुधारू शकेल. आरोग्याबाबत आपली जीवनशैली सुधारण्याचा विचार कराल.

**कुंभ** – कुटुंबाच्या मदतीने आर्थिक स्थिरता येईल. आरोग्याच्या बाबतीत चांगला आहार व व्यायाम महत्त्वाचा ठरेल.

**मीन** – कठीण परिस्थितीवर धैर्याने मात करू शकाल. कार्यक्षेत्रातील सकारात्मक बदल आपल्यासाठी फायदेशीर ठरेल.

# नायलॉन मांजामुळे जीवावर 'संक्रांत'

## गंभीर जखमी झालेल्या पोलीस उपनिरीक्षकावर शस्त्रक्रिया

**छत्रपती संभाजीनगर (दिगंबर जाधव)-** कायद्यानं बंदी असलेल्या नायलॉन मांजाचा पतंगबाजीसाठी सर्रासपणे वापर सुरू आहे. मकरसंक्रांतीच्या दिवशीच सकाळी चक्क पोलीस अधिकारी मांजामुळे जखमी झाल्याची घटना समोर घडली. पोलीस उपनिरीक्षक दीपक पारदे असे जखमी अधिकाऱ्याचं नाव आहे.

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरात नायलॉन मांजा विक्रेत्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. मागील काही दिवसांत अनेकांचे गळे चिरल्याच्या राज्यात घटना घडल्या आहेत. अशातच पोलीस अधिकारी दीपक पारदे मांजामुळे जखमी झाले आहेत. ते छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे कर्तव्यात नियुक्त आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. पोलीस अधिकाऱ्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

ग्रामीण पोलिसात कार्यरत असलेले दीपक पारदे सकाळी कर्तव्यावर जाण्यासाठी नाईकनगर येथून निघाले. रेणुका माता कमानीजवळ पोहोचल्यानंतर त्यांच्या गळयात मांजा अडकला. मांजा अडकल्यानं ते खाली पडले. गळयात मांजा अक्षरशः गुंडाळला गेला होता. त्यांच्या गळयातून मोठ्या प्रमाणात



रक्तस्त्राव सुरू झाला. त्यांना तातडीने दर्गा चौकातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती नाजूक असल्यानं तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. माहिती मिळताच ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्यासह अधिकाऱ्यांनी रुग्णालयाकडे धाव घेतली. शहरात ठिकठिकाणी पोलिसांकडून नायलॉन मांजावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तरीदेखील शहरात हा मांजा सर्रास वापरला जात असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. मकर संक्रांत हा उत्सव उत्साहात साजरा करताना पतंग उडविण्याची चढाओढ सुरू असते. इमारतीच्या छतावर संगीताच्या तालावर, खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊन पतंगबाजी केली जाते. जुन्या शहरात मोठ्या-प्रमाणात धोका असतो. मागील काही वर्षात साध्या मांजाऐवजी नायलॉन मांजाचा वापर सर्रासपणे सुरू आहे. कायद्याने बंदी असतानाही प्रशासनाकडून वापरकर्ते आणि विक्रेत्यांना ढील दिल्याचे चित्र आहे. काही प्रमाणात नायलॉन मांजा विक्रेत्यांवर पोलिसांकडून गंभीर स्वरूपाचे गुन्हेही दाखल करण्यात आले. मात्र, छुप्या मार्गाने शहरात मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजा येत आहे. संक्रांतीनिमित्त पतंगबाजी करणारे तर हमखास नायलॉन मांजाचा वापर करत आहेत.

# पुणे वर्तुळाकार रस्ता: तीन टप्प्यासाठी आर्थिक निविदा खुल्या

**मुंबई (विशाल पाटील) :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे काम १२ टप्प्यांत होणार असून यापूर्वी नऊ टप्प्यांतील कामासाठी निविदा अंतिम करून कंत्राट बहाल करण्यात आली. आता उर्वरित तीन टप्प्यांतील कामासाठीच्या आर्थिक निविदा सोमवारी खुल्या करण्यात आल्या. त्यानुसार दोन टप्प्यासाठी अफकॉन इन्फ्रास्ट्रक्चरकडून तर एका टप्प्यासाठी जीआर इन्फ्राप्रोजेक्टकडून सर्वात कमी बोली लावण्यात आली आहे. त्यामुळे या दोन कंपन्यांना कंत्राट मिळण्याची शक्यता आहे. त्यानुसार लवकरच कंत्राट अंतिम केले जाणार आहे. एमएसआरडीसी १२६ किमी लांबीच्या पुणे वर्तुळाकार रस्त्याचे काम हाती घेणार आहे. येत्या काही दिवसातच या प्रकल्पाचे भूमिपूजन होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाणार आहे. या प्रकल्पातील नऊ टप्प्यांतील कामाचे कंत्राट बहाल करून पात्र कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले आहेत. भूसंपादनही अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पाला




आणखी वेग देण्यासाठी उर्वरित तीन टप्प्यांतील निविदा प्रक्रिया अंतिम करण्याच्या कामालाही वेग देण्यात आला आहे. १२ पैकी तीन टप्प्यांची निविदा प्रक्रिया काही कारणाने उशीराने सुरू झाली असून सोमवारी तीन टप्प्यांसाठीच्या आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. वलाटी, हवेली ते सोनेरी, पुरंदर या ई ५ टप्प्यासाठी अफकॉन आणि नवयुगा इंजिनीअरिंग कंपनीकडून आर्थिक निविदा सादर करण्यात आल्या होत्या. तर सोनोरी ते गराडे, पुरंदर या ई ६ टप्प्यासाठी जीआर इन्फ्राप्रोजेक्ट, पटेल इन्फ्रास्ट्रक्चर, पीएनसी इन्फ्राटेकसह अन्य एका कंपनीने आर्थिक निविदा सादर केली आहे.

SPORT

# No WAGs, family on tour: BCCI disciplines India after disastrous Australia series

**NEW DELHI :** An unhappy Indian Cricket Board (BCCI) is set to take strict measures against the Indian cricket team after their disastrous tour of Australia. Sources have told India Today that the BCCI is set to curb family-time for the Indian players, by not allowing wives and girlfriends to live with the players beyond 2 weeks on a tour that last over one and a half months.

Sources further suggested that it will be made mandatory for all players that they have to travel by the team bus and would have to pay for extra luggage.

The move comes



after the Indian team lost the Border-Gavaskar Trophy 1-3 in Australia. The team was not only hammered in the Test series, media reports coming out of Australia also suggested that the mood in the dressing room was off as well. Multiple controversies hurt the Indian team in their tour of Australia - starting from the retirement of Ravichandran Ashwin, a player projecting himself as the interim captain and then Rohit Sharma dropping himself from the side in the final match of the series.

Sources have told India Today that the BCCI was not happy with what unfolded and is set to take strict action against the Indian team by introducing new guidelines.

Head coach Gautam Gambhir's personal

### Suggested Rules By The BCCI

- If tournament is 45 or More days event - family will only be allowed to stay with players for 14 days.
- And if tour is less than that then it may go down to 7 days.
- Wives can't stay with players for entire tournament.
- Families can only stay for 2 weeks.
- All players will have to travel in team bus.


manager will not allowed in the team bus or the VIP box. He will also have to stay in a different hotel.

If players luggage is more than 150kg BCCI, will not pay extra luggage charges.

The BCCI recently held a review meeting with Rohit Sharma and Gautam Gambhir after the Australia series. While the BCCI decided to avoid any knee-jerk reactions in terms of the combination of the team. It is understood that with an important ODI tournament like the Champions Trophy scheduled in another six weeks' time, any immediate reaction would have a negative impact on the team as well as the support staff.

# Why Arjun Tendulkar stopped training with Yograj Singh

**NEW DELHI :** Legendary India all-rounder Yuvraj Singh's father, Yograj Singh, recently revealed why Arjun Tendulkar stopped training under him. Arjun, son of legendary India cricketer Sachin Tendulkar, trained under Yograj in 2022. The southpaw went on to make his IPL debut the very next year and put up some notable performances in domestic cricket.



Recently, Yograj opened up on training Arjun and mentioned how he scored a century after training under him for just 12 days. However, he revealed that people feared that Arjun's name would get stuck with him.

"Sachin's son. He comes here for 12 days and scores a hundred. When he scored a hundred on debut and then came back to IPL, people feared that his (Arjun) name will get stuck with him (Yograj). Are you understanding my point?," Yograj said on 'Unfiltered by Samdish'.

Further speaking ahead, Yograj disclosed that he even told Yuvraj to call Sachin and let Arjun train under him for a year.

"People are very afraid of name-sticking. I told Yuvi (Yuvraj) to call Sachin and ask him to give me Arjun for a year. See what happens after that," he added.

Meanwhile, Arjun wasn't in the best of forms in the recent domestic season as he's scored 40 runs from two innings in the ongoing Vijay Hazare Trophy 2024-25. With the ball, he's scalped four wickets from three matches.





# Gavaskar blasts BCCI over Rohit Sharma's Australia act, bluntly tells Ajit Agarkar to 'not hand India cap like that'

**NEW DELHI :** India batting legend Sunil Gavaskar was not in favour of the team travelling without Indian captain Rohit Sharma for the Border-Gavaskar Test series opener last October when reports had confirmed that the 37-year-old will miss the Perth match owing to birth of his second child, and despite criticism on his comment, he stuck to his statement days after the end of the Australia tour. In a fresh remark on his column for Sportstar, Gavaskar lashed out at the BCCI for allowing it. Rohit had missed the series opener, where Jasprit Bumrah led the Indian team to their only win in an otherwise forgettable tour. The 37-year-old rejoined the side ahead of the second Test in Adelaide, but what followed was another poor run of form as he managed just 31 runs in five innings at 6.2.Taking to his column, Gavaskar reckoned the arrival of the Indian team in Perth without their captain sent a signal of weakness to Australia as he urged BCCI to always send the team in whole for overseas assignments. "The mistakes that were made in Australia should not be repeated. The team should arrive in England in one group and not in four batches as was done in Australia. For the first two days in Australia, the team was without captain, vice-captain and coach. What kind of a message does it send to the home team? That here's a team that has arrived with no leadership group and can be easily broken with a few tough performances. Surely the BCCI will not allow this to happen again.

# Shubman Gill, Jasprit Bumrah OUT; KL Rahul IN, Hardik Pandya VC: India's Strongest XI For ICC Champions Trophy

**NEW DELHI :** The India squad for the ICC Champions Trophy is yet to be announced. It was set to be revealed before the January 12 deadline to submit the squads, but the BCCI delayed it by a week. The squad is likely to be announced on January 17. The selectors have a lot of questions to answer before naming the squad. The biggest concern for them is the injury of Jasprit Bumrah. The ace India pacer picked up a back injury during the fifth Test vs



India. Bumrah is doubtful for the mega event. Given how critical Bumrah is for India, especially in Test cricket, he is unlikely to be risked unless he is 100 percent fit. India can make for Bumrah with Mohammed Shami, who was picked in the India T20I squad for the England series and is almost certain to be picked in the Champions Trophy squad. Another dilemma for the selectors will be to pick Rishabh Pant or Sanju Samson as the primary wicketkeeper batter. While Samson has done well for India, Rishabh Pant is leading the race to grab the role. Yashasvi Jaiswal could also be picked in the squad. Shubman Gill has struggled in recent times and there are high odds that Jaiswal could make his ODI debut in the Champions Trophy.

Axar Patel is almost a certainty to the squad, with Ravindra Jadeja unlikely to get picked. The snub could mark the end of Jadeja's ODI career. It will also be a toss-up between Shreyas Iyer and Suryakumar Yadav for the middle-order batter position and Iyer should get a nod ahead of Yadav, who hasn't been great in limited ODIs he has played. Varun Chakravarthy is yet to make his ODI debut but given his form and injury concerns with Kuldeep Yadav, he could lead India's spin attack in Champions Trophy.

# Sold His House And Left A Secure Job: Etienne Blaszkewycz's Risks For Pickleball Journey Is Reaping Rewards

**NEW DELHI :** A Canadian school PE teacher took on the biggest gamble of his life—selling his house and giving up a secure job to pursue a career in professional pickleball. Today, 32-year-old Etienne Blaszkewycz finds himself on Indian shores, ready to represent the Chennai Super Champs in the inaugural World Pickleball League (WPBL).

Hailing from Montreal, Canada, Etienne had a stable career as a physical education teacher. However, three years ago, he stumbled upon pickleball. Captivated by the sport, he made the difficult decision to leave his job, sell his condominium, and move to Texas, USA, in hopes of making a career out of



the it.

Where others mocked, Etienne found inspiration. "Everyone said I was crazy and would lose all my money and waste my time," he admits. But the allure of pickleball was undeniable. "I discovered pickleball, and I became addicted."

Etienne trained daily with some of the best players in Austin and began competing in high-stakes tournaments, quickly making a mark. "I love my new life here (Austin), it was worth all the effort and grind," Etienne remarked.

In a short span, Etienne has earned an impressive DUPR (Dynamic Universal Pickleball Rating) of 5.7 in singles and 6.0 in doubles. His victories over established names like Jack Sock and Callie Smith added to his reputation as a rising star. With notable performances in both singles and doubles, he established himself as one of the most promising players in the pickleball circuit.

# ई रिक्षा संघटनेचे उपोषण तात्पुरता स्थगित



● माथेरान, फरीद डावरे :

सुप्रीम कोर्टात बुधवार दि १५ जानेवारी रोजी ई रिक्षा व क्ले पेव्हर ब्लॉक्स यांची सुनावणी असल्याने श्रमिक रिक्षा संघटनेचे नियोजित बेमुदत उपोषण स्थगित करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी संघटनेच्या निर्णयाचे स्वागत केले. आगामी सनियंत्रण समितीच्या बैठकीत उरवरीत ७४ हात रिक्षा चालकांची ई रिक्षाची मागणी विषय पत्रिकेत घेण्यात येईल याची ग्वाही दिली जिल्हाधिकारी रायगड यांनी सुप्रीम कोर्टाला जे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे त्यात माथेरान पोलीस स्टेशन तर्फे जी कायदेशीर दृष्ट्या योग्य आहे ती ९४ हातरिक्षा चालकांची यादी सादर केली आहे . अशी माहिती मुख्याधिकारी इंगळे यांनी श्रमिक रिक्षा संघटनेच्या सदस्यांना दिली आहे. रिक्षा संघटनेचे पदाधिकारी शकील पटेल, प्रकाश सुतार, सुनिल शिंदे, जहुर चिपाडे, अली डोंगरे,नागेश कदम, शैलेश भोसले, रुपेश गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.

■ मा. सुप्रीम कोर्टाने ई रिक्षांची संख्या ठरवण्याचा अधिकार सनियंत्रण समितीला दिला आहे. पायलट प्रोजेक्टचा संपूर्ण एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. पावसाळ्यात ई रिक्षा सुरळीत चालल्या त्यामुळे बाकी ७४ हात रिक्षा चालकांना ई रिक्षाची परवानगी तात्काळ देण्यात आली पाहिजे.

- शकील पटेल- अध्यक्ष श्रमिक रिक्षा संघटना

# सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा

● ठाणे, सम्यक कासारे :

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या आदेशानुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व पार्टनर NGO YRG Care तसेच सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ जानेवारी २०२५ रोजी सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने आरोग्य विभागाच्या एचआयव्ही/एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, ठाणे या विभागाने महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा मुख्य



उद्देश युवकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित व सकारात्मक जीवनशैलीविषयी माहिती देणे होता. या कार्यक्रमात एचआयव्ही/एड्सविषयी तज्ज्ञांनी युवकांसमोर एड्सचा धोका, कारणे, प्रतिबंधात्मक उपाय, तसेच उपचारांच्या उपलब्ध सोयी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी मोफत एचआयव्ही तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत, यामध्ये मोठ्या प्रमाणावर युवकांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहनही करण्यात आले. युवकांना सुरक्षित लैंगिक व्यवहार, आरोग्यविषयक स्वच्छता, आणि समुपदेशनाच्या महत्त्वाबद्दल माहिती देण्यात आली. तसेच विविध संस्थाच्या माध्यमातून प्रदर्शन व माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. एचआयव्ही/एड्सविषयक माहिती समजावून सांगण्यासाठी पोस्टर प्रदर्शन आणि माहितीपत्रकांचे वाटपही करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्याकडून सहाय्यक संचालक बेसिक सर्विसेस व प्रिवेंशन विभाग, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे डॉ.राहुल जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, म.रा.ए.नि. संस्थेचे युवा समन्वय श्री. अनुराग कुलकर्णी, ज्ञान साधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगूरे, कुटुंब कल्याण व प्रशिक्षण केंद्र, ठाणेच्या प्राचार्या डॉ.शुमा राठोड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.रतन गाढवे, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हापर्यवेक्षक श्री.अशोक देशमुख, श्रीमती नीलिमा पाटील, CSO ठाणेच्या श्रीमती प्रफुलता चुरी, YRG संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हा प्रयत्न सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला आहे. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनाने युवकांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी समाजासाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा घेतली. तसेच नर्सिंग प्रशिक्षण केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय व ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

# आरटीई प्रवेशासाठी अर्ज सुरू; २७ तारखेपर्यंत करता येणार अर्ज

● ठाणे, रोहित जैसवार :



'आरटीई' अंतर्गत २५ टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रियेत १४ जानेवारीपासून ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आले आहे. बालकांच्या पालकांना २७ जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार असून पालकांनी प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असणाऱ्या जास्तीत जास्त बालकांच्या अर्जाची नोंदणी करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार(आरटीई) कायद्या अंतर्गत वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिले जातात. ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२० रिक्त जागा उपलब्ध आहेत.

'आरटीई' अंतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत बालकांच्या अर्ज नोंदणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून https://student.maharashtra.gov.in/adm_Portal या वेबसाईटवर दि. १४ जानेवारीपासून ते २७ जानेवारीपर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पालकांसाठी मदत केंद्रांची यादी, ऑनलाईन प्रक्रियेत अर्ज नोंदणी बाबत मार्गदर्शक पुस्तिका, आवश्यक कागदपत्रे इत्यादी बाबत सर्व माहिती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली आहे.

# नाशिकमध्ये नायलॉन मांजा तारांमध्ये अडकून वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार

● नाशिक, सचिन कदम :



प्रतिबंधित नायलॉन मांजा दुचाकी वाहनधारकाच्या जिवावर बेतत असताना दुसरीकडे तो शहरातील अनेक भागात वीज पुरवठा खंडित होण्यास कारक ठरला. वाहिन्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा तुटता तुटत नाही. पतंग उडवणाऱ्यांकडून तो खेचला जातो. या स्थितीत वाहिन्या एकमेकांवर घासल्या जाऊन प्रणालीत दोष उद्भवण्याचे प्रकार घडले. वीज खांब व वाहिन्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढण्यासाठी कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागत आहे.पतंगोत्सवात नायलॉन मांजाच्या वापराला बंदी असूनही वेगवेगळ्या घटनांमधून त्याचा सर्रास वापर झाल्याचे पहायला मिळाले. नायलॉन मांजाने पाथर्डी फाटा-वडनेर रस्त्यावर दुचाकीस्वार युवकाला जीव गमवावा लागला. हा मांजा अडकून काही दिवसात अनेक दुचाकीस्वार जखमी झाले. मकरसंक्रातीच्या दिवशी म्हणजे मंगळवारी नायलॉन मांजाने वीज वितरणातही अडथळे आले. वाहिन्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा अनेक भागात वीज खंडित होण्याचे कारण ठरल्याचे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी सांगतात. कामटवाडे व परिसरात तीन, चार वेळा नायलॉन मांजा अडकल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित झाला. वाहिन्यांवर अडकलेला नायलॉन मांजाची ओढाताण केली गेली. काही ठिकाणी दोन वाहिन्या परस्परांवर घासल्या गेल्यामुळे रोहित्र बंद (ट्रीप) होण्याचे प्रकार घडले.

# मोदी आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यातील मैत्री वाढली?




● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :


काश्मीर खोरे आणि लडाखला जोडणाऱ्या झेड-मोढ या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या बोगद्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले. यासोमवारी झालेल्या उद्घाटनानंतर सोनमर्गमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यात चांगलीच जवळीक दिसून आली. इतकेच नाही तर ओमर अब्दुल्ला यांनी या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींवर कौतुकाचा वर्षाव केला, तर पंतप्रधान मोदी यांनी देखील ओमर अब्दुल्ला यांच्या फोटोग्राफी कौशल्याची स्तुती केली.

आपल्या स्वागताच्या भाषणात अब्दुल्ला यांनी पंतप्रधान मोदी आणि जम्मू काश्मीरची जनता यांच्यातील विश्वास वाढत असल्याचा मुद्दा मांडला. तसेच पुढे बोलताना त्यांनी 'दिल आणि दिल्ली' मधील अंतर कमी करण्याबरोबरच मोदी आपली इतर आश्वासने कशी पूर्ण करत आहेत, याबद्दल भाषण दिलं.

# बुटीबोरी पूलप्रकरणी राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर प्रश्नचिन्ह, साडेतीन वर्षांत पुलास तडे

● नागपूर, नितीन देवळेकर :

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जम्मू-काश्मीर, लेह-लडाख यासह अतिशय दुर्मिळ भागात रस्ते बांधणी, पूल उभारण्याचे करीत आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये सोनमर्ग बोगदा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. एनएचएआयने अनेक रस्ते विक्रमी वेळेत पूर्ण केले आहे. परंतु केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या जिल्ह्यातील नागपूर- हैदराबाद



दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील बुटीबोरी उड्डाण पूल साडेतीन वर्षांत खचल्याने एनएचएआयच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह निर्माण केले जात आहेत.

एनएचएआयने ६.४ किमी लांबीचा मुख्य सोनमर्ग बोगदा बांधला आहे. तो काल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. तसेच झोजिला बोगदा २०२८ साला पर्यंत पूर्ण होणार असून सोनमर्ग प्रकल्पामुळे या मार्गाचे अंतर ४९ किमी वरून ४३ किमी इतके कमी होईल. यामुळे श्रीनगर खोरे ते लडाख पर्यंत जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. १ वरील प्रवास अधिक सुरळीत होणार आहे. एकीकडे समुद्रसपाटीपासून ८ हजार फुटांहून अधिक उंचीवर बोगदा बांधण्यात येत आहेत. मात्र, साडेतीन वर्षांतच तडे गेल्याने बुटीबोरी पुलाची व्हीएनआयटीकडून तपासणी सुरू असून या पुलाला पाडून नवीन बांधायचे की डागडूजी करायची यासंदर्भात अद्याप निर्णय झाला नाही. दरम्यान, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या अंदाजानुसार हा पूल ९ एप्रिलपर्यंत पूर्ववत होण्याची शक्यता नाही. त्यामुळे चंद्रपूर आणि वर्धेकडून येणारी वाहतूक समृद्धीमार्गे वळण्यात आली आहे.

# माता मृत्यू आणि बाल मृत्यू पूर्णपणे थांबवण्यासाठी ठोस कार्यक्रम आखण्यात येईल - राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर

● पालघर, सुचिता सोनावणे :

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात झालेले बालमृत्यू आणि माता मृत्यू या घटना दुर्दैवी असून यापुढे एक ही माता मृत्यू किंवा बालमृत्यू होणार नाही यासाठी ठोस कार्यक्रम आखण्यात येईल असे प्रतिपादन आज राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघनाताई साकोरे -बोर्डीकर यांनी जव्हार येथे केले.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि महिला व बाल विकास विभामार्फत आज दिनांक १४ जानेवारी रोजी जव्हार तालुक्यातील जामसर येथे मकर संक्रांति निमित्त भव्य महिला आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यातील सर्व बहिणीं पर्यंत आरोग्याच्या सेवा पोचल्या पाहिजेत या हेतूने ही मोहीम सुरू केली असून त्याची राज्यस्तरीय सुरुवात आज जामसर येथील शिबिरामार्फत करण्यात येत आहे याचा मला आनंद आहे असे त्या यावेळी म्हणाल्या. तसेच खासदारांनी केलेली रक्तपेढी आणि महिला हॉस्पिटल ची मागणी देखील मान्य करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी सांगितले. जिल्ह्यात चांगली आरोग्य यंत्रणा उभी करण्याचा शासनाचा




मानस असून सर्वांची काळजी घेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे सांगून सर्वांनी एकत्रित येऊन काम केले तर हे सहज शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम,खासदार डॉ.हेमंत सवरा,आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी गोविंद बोडके,मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे,उपाध्यक्ष पंकज कोरे,सभापती बांधकाम आणि आरोग्य संदेश ढोणे,सभापती कृषी व पशु संवर्धन संदिप पावडे,जिल्हा परिषद सदस्य सुरेखा थेतले, सभापती विजया लहारे, उपसभापती पाडवी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. महिलांनी तारपा नृत्य करून राज्यमंत्री मेघना साकोरे यांचे स्वागत



केले. त्यांनी देखील महिलांच्या जोडीला तारप्यावर फेर धरला.

तसेच मकर संक्रांतीनिमित्त आरोग्य विभागातील महिलांनी मेघना साकोरे यांना वाण देऊन हळदी कुंकू दिले. सदर आरोग्य शिबिरात जव्हार तालुक्यातील माता, गर्भवती माता तसेच इतर तपासणीसाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या आजाराची तपासणी करण्यात आली. दंतचिकित्सा, डोळेतपासणी,रक्तदाब तसेच इतर सर्व तपासण्या या शिबिरामध्ये करण्यात आल्या. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी फक्त दवाखाने नकोत तर त्यांच्यासोबत डॉक्टर पण हवेत अशी सर्व उपस्थित जनतेच्या वतीने मागणी केली. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी जिल्ह्यात महिला हॉस्पिटल आणि एक सुसज्ज सिव्हिल हॉस्पिटल,रक्तपेढी असणे गरजेचे आहे.तसेच आदिवासी भागात आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त भत्ता द्या, असे सांगून रिक्त जागा, तसेच आरोग्यविषयक इतर समस्या यावर प्रकाश टाकला. आमदार हरिश्चंद्र भोये यांनी राज्यातील पहिले शिबिर जव्हार येथे घेतल्याबद्दल आभार मानून साखर शेत प्राथमिक आरोग्य केंद्राला लवकर मंजुरी मिळणेसाठी मेघना साकोरे यांना विनंती केली. शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून तेथील गर्भवती माता, प्रसूत माता यांच्याशी राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी संवाद साधला.

यानंतर जव्हार येथे आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणीपुरवठा विभागाचा विस्तृत आढावा घेऊन या विभागातील अडचणी जाणून त्यावर .सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके, प्रकल्प अधिकारी जव्हार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ.किरण पाटील यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले.यावेळी आरोग्य विभाग महिला व बालविकास विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.